# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

दुपार

---

**दिनांक १८.०३.२०२३ शनीवार**

**(कामगिरी)**

**गुन्हे शाखा युनिट क्र.२ पोलीसांची कामगिरी :— वाहन चोरास वाहनासह अटक**

दिनांक. २०.०२.२०२३ चे १८.३० वा चे सुमारास पोलीस ठाणे सदर हद्दीत विजय नगर, सुरज अर्पामेंटचे जवळ, छावणी नागपूर येथे राहणारे फिर्यादी यास्मीन कादीर खान वय ३३ वर्षे यांनी त्यांची मोपेड ॲक्टीव्हा गाडी क्र. एम.एच. ३१ डी.पी ६९३१ ही मंगळवारी कॉम्प्लेक्स, बाहेरील पार्किंगमध्ये सदर, येथे पार्क केली असता कोणीतारी अज्ञात चोरट्याने त्यांची मोपेड गाडी हि चोरून नेली. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या रिपोर्ट वरून पो.ठाणे सदर नागपूर येथे अज्ञात आरोपी विरूध्द कलम ३७९ भा.द.वी. प्रमाणे गुन्हा नोद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे तपासा दरम्यान गुन्हे शाखा युनिट क्र. २ चे अधिकारी व अंमलदार यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली कि आरोपी नामे सलमान खॉन वल्द दिलावर खॉन पठाण, वय २४ वर्षे, **रा.** गोलबाजार, इमलीपुरा, मोठ्या मस्जीद जवळ, आष्टी, तह. आष्टी, जि. वर्धा. **ह.मु.** आय.बी.एम.रोड, मोठी मस्जीद समोर, अहमद पटेल यांचे घरी किरायाने पो.ठाणे गिट्टीखदान याचे ''या—गौस बाईक रिपेरींग सेंटर, पत्ता— हार्डली डेव्हीडसन शो—रूम समोर, रिंग रोड फुटपाथवर, मानकापुर चौक येथे स्वत:चे गॅरेज असुन तो मॅकॅनिक असुन तो काही दिवसापासुन चोरीचे वाहन वापरीत आहे. आणि सद्या तो सदरील वाहन विक्री करणेस गिऱ्हाईकाचा शोध घेत आहे.'' अशा प्राप्त झालेल्या माहिती नुसार गुन्हे प्रकटीकरण पथक क्रमांक ०२, येथे कार्यरत अधिकारी व अमंलदार यांनी अत्यंत शिताफीने छापा कार्यवाही केली असता सदर इसमाचे ताब्यात यात नमुद वाहन मिळुन आले. त्यानंतर सदर वाहनाबाबत विचारणा केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिल्याने त्यास ताब्यात घेवुन विचापुस केली असता त्यांनी पांढऱ्या रंगाची ॲक्टीव्हा दुचाकी वाहन क्र. एम.एच३१—डी.पी.६९३१ कि. अं. ६०,०००/— रू ची ही सदर पोलीस ठाणे हद्दीतील मंगळवारी कॉम्प्लेक्स बाहेरील पार्किंग मधुन चोरी केल्याचे सांगीतले तसेच पो.ठाणे सदर यांचे अभिलेखावर पाहणी केली असता, वर नमुद वाहना बाबत पोलीस ठाणे सदर येथे कलम ३७९ भा.दं.वी अनुसार गुन्हा नोंद असल्याचे दिसुन आल्याने आरोपी यांस वाहनसह नमुद गुन्ह्याचे तपासकामी पुढील कार्यवाहीस्तव पो.ठाणे सदर, नागपुर शहर चे ताब्यात सुपुर्द करण्यात आले.

सदरची कारवाई मा.पोलीस उप—आयुक्त (डिटेक्शन), श्री. मुम्मका सुदर्शन, सपोआ श्री. सिडाम सा़, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल शिरे, सपोनि. तुषार काळेल, गजानन चांभारे, पोहवा. रामनरेश यादव, संतोषसिंग ठाकुर, शेषराव राऊत, नापोअं. नितेश इंगळे, किशोर ठाकरे, गजानन कुबडे, पोअं. प्रविण चव्हाण यांनी केली.

**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे कळमणा : — खंडणी मागणाऱ्या आरोपीस अटक**

दिनांक १६.०३.२०२३ चे २१.३० वा. चे सुमारास पो.ठाणे कळमणा हद्दीत क्वार्टर न. १९२, चे समोर मिनीमाता नगर, पाच झोपडा, गंगाधर किराणा स्टोअर्स, नागपूर येथे राहणारे फिर्यादी नामे बंटी राजेश शाहु वय ३१ वर्ष, हा घरच्या घरी पान ठेला चालवत असुन नमुद गुन्हयातील आरोपी नामे मुकेश जितलाल पाटील वय ३० वर्ष रा. क्वार्टर न. २०४, मिनीमाता नगर, पाच झोपडा, कळमणा नागपूर हा फिर्यादीचे घरा समोर आला असता फिर्यादीने आरोपीस त्याचेवर असलेली पान मसाल्याचे उधारी पैसे मांगीतले असता आरोपीने पैसे देण्यास नकार देवुन त्याचा साथिदार विधिसंघर्षग्रस्त बालक यास बोलावुन घेतले व फिर्यादीसोबत धक्काबुक्की करून फिर्यादीस “तेरे कायके उधारी

पैसे” असे म्हणुन अश्लिल शिवीगाळ करून चाकु दाखवुन “तु मुझे अभी के अभी ५००/—रू दे नही तो तेरा काम कर दुंगा” अशी धमकी देवुन चाकु हवेत फिरवला अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमणा येथे पोउपनि झिंगरे ८६६९०३८८५० यांनी आरोपीविरूध्द कलम ३८७, ३२३, २९४, ५०६(ब), ३४ भा.द.वि. सहकलम ४/२५ भा.ह.का सहकलम १३५ म.पो.का अन्वये गुन्हा दाखल करून आरोपी क्र. १ यास अटक केले आहे. पुढील तपास सुरू आहे.

**( अकस्मात मृत्यु )**

**१) पोलीस ठाणे पारडी :** — दिनांक १७.०३.२०२३ चे १७.३० वा चे पुर्वी पो.ठाणे पारडी हद्दीत सुभाष मैदान, मोहकर वाडी येथे राहणारे फिर्यादी नामे दिलीप मनोहर बाकडे वय ४० वर्ष यांचा मुलगा हा पारडी तलमले वाडी येथे मैदानावर क्रिकेट खेळत असतांना बॉल तेथे असलेली विहीरीत पडला असता मुले बॉल काढण्याकरीता गेले असता विहीरीतुन घाणेरडा वास आल्याने मुलांनी विहीरीत काहीतरी पडला आहे असा फिर्यादीला सांगीतल्याने फिर्यादीने लगेच जावुन पाहणी केली असता तेथे एक अनोळखी ईसम वय ३० ते ३५ वर्ष वयाचा ईसम हा विहीरीत उबडा पडलेला दिसल्याने त्यास पोलीसांचे व फायरब्रिगेड यांचे सहाय्याने बाहेर काढुन मेयो हॉस्पीटल येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे पारडी येथे पोउपनि इंगळे ९७६५६५६४७० यांनी अकस्मात मृत्युची नोंद घेतलेली आहे.

**२) पोलीस ठाणे हुडकेश्वर :** — दिनांक १२.०३.२०२३ चे १५.३० वा चे दरम्यान पो.ठाणे हुडकेश्वर हद्दीत बहादुराफाटा, ब्रहमदेव नगर, हुडकेश्वर येथे राहणाऱ्या शोभा महादेव पिल्लारे वय ५१ वर्ष, हया मानसिक रूग्ण असुन त्यांनी आपले राहते घरी स्वत:ला जाळुण घेतल्याने घरच्या लोकांनी त्यांना उपचारकामी मेडीकल हॉस्पीटल वार्ड क्र. ४ येथे दाखल केले असता उपचारा दरम्यान दि. १७.०३.२०२३ चे १४.१५ वा चे दरम्यान डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे पोउपनि पवार ८०५५५२४५९९ यांनी अकस्मात मृत्युची नोंद घेतलेली आहे.

**(मिसींग)**

**१) पोलीस ठाणे पाचपावली :**— भारत नागोराव गोडघाटे वय ४५ वर्ष रा. कुन्हाडकर पेट, पाचपावली, नागपूर हे दि. ०६.०१.२०२३ चे ११.०० वा पासुन पो.ठाणे पाचपावली हद्दीतुन राहते घरी कुणाला काहीही न सांगता निघून गेले, परत आले नाही, मिसींग आहे, शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** — रंग —सावळा, चेहरा — लांबट, बांधा — सडपातळ, उंची ५ फुट, केस— काळे पांढरे, अंगात— पांढऱ्या रंगाचा शर्ट व पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.



भारत

**(अंकुश राठोड)**
पोलीस उप निरीक्षक
पोलीस जनसंपर्क अधिकारी
नागपूर शहर.